# विनोद कांबळीचे जोरदार कमबॅक

## फ्लॅमबॉय जाहिरातीच्या पीचवर परतला

**महाईन्यूज । मुंबई**



**भारताचा माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी गेल्या काही काळापासून त्याच्या डाऊन फॉल आणि शारीरिक व्याधींबाबत जास्त चर्चेत होता. मध्यंतरी त्याची प्रकृती अत्यंत खालवली होती. तसेच त्याची आर्थिक स्थिती देखील अत्यंत बेताची झाली आहे.**

मात्र या माजी क्रिकेटपटूने आपली जिद्द सोडलेली नाही. त्याने कमबॅक करण्याचा जोरदार प्रयत्न केला आहे. नुकतेच विनोद कांबळी हा एका जाहिरातीत झळकला आहे. त्याने एका आईसक्रीम ब्रँडची जाहिरात केली असून यात विनोद कांबळीच्या परिस्थितीचा भावनिकरित्या उत्तम वापर करून घेण्यात आला आहे.

त्याचा जिनको लिये लाईफ मे कम मिला उनके लिया थोडा ज्यादा... हे वाक्य मनाला स्पर्श करून जातं. ही जाहिरात ज्यावेळी आईस्क्रीमची मागणी प्रचंड असते त्या उन्हाळ्याच्या काळात आली आहे.

विनोद कांबळीला या जाहिरातीत घेऊन या आईस्क्रीम कंपनीने त्याच्या आयुष्यातील चढ उतार आणि गुणवत्ता असून मागे पडलेला खेळाडू याचा आपल्या जाहिरातीसाठी वापर करून घेतला. जाहिरातीतील विनोद कांबळीचा रोल पाहिला तर त्याची प्रकृती फार चांगली आहे असं जाणवत नाही. त्याला शब्द उच्चारताना अजून त्रास होत असल्याचे जाणवते.

विनोद कांबळी गंभीर आजारामुळे त्रस्त आहे. त्याला उपचारासाठी देखील पैसे नाहीयेत. त्यामुळे वेळोवेळी माजी क्रिकेटपटू त्याला आर्थिक मदत करण्याचे आवाहन करत असतात. अशातच आता विनोद कांबळीची ही जाहिरात सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. त्यामुळे आता विनोद कांबळी हा आयुष्याच्या या टप्प्यावर देखील जोरदार कमबॅक करणार अशी आशा पल्लवीत झाली आहे.




# राजस्थानच्या गोलंदाजावर विजयानंतर दंडात्मक कारवाई

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपर जायंट्स यांच्यात कमी धावसंख्येचा थरारक सामना पाहायला मिळाला. या सामन्यात राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना १५९ धावा केल्या, तर प्रत्युत्तरात लखनौचा संपूर्ण संघ ११९ धावांवर सर्वबाद झाला. यासह राजस्थानने ४० धावांनी विजय मिळवत गुणतालिकेत आपलं स्थान अधिक भक्कम केलं. पण या विजयानंतर राजस्थानच्या खेळाडूला मात्र धक्का बसला आहे.**



राजस्थान रॉयल्सच गोलंदाज नांद्रे बर्गर याला दंड ठोठावण्यात आला. राजस्थानच्या या वेगवान गोलंदाजाला विनाकारण दंड ठोठावण्यात आला नाही; लखनौचा कर्णधार ऋषभ पंतसमोर त्याने केलेली कृती आयपीएलच्या आचारसंहितेच्या विरोधात मानली गेली. त्याला सामनाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात आले, जिथे त्याने आपली चूक कबूल केली आणि त्याला शिक्षा झाली.

नांद्रे बर्गरवर बीसीसीआयने दंडात्मक कारवाई केली असून त्याच्या सामना फीच्या १० टक्के रक्कम त्याला भरावी लागणार आहे. याव्यतिरिक्त, त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉईंट देखील जोडण्यात आला. राजस्थान रॉयल्सचा डावखुरा गोलंदाज आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.५ अंतर्गत लेव्हल १ च्या गुन्ह्यासाठी दोषी आढळला. त्याने सामनाधिकाऱ्यांसमोर आपली चूक कबूल केली.

राजस्थान रॉयल्सने हा सामना ४० धावांनी जिंकला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खूप खराब झाली. त्यांचे आघाडीचे फलंदाज झटपट तंबूत परतले. मात्र, मधल्या फळीत रवींद्र जडेजाने २९ चेंडूंमध्ये नाबाद ४३ धावा करून राजस्थानचा डाव सावरला. परिणामी, राजस्थानने २० षटकांत ६ गडी गमावून १५९ धावा केल्या.

प्रत्युत्तरात, १६० धावांचे लक्ष्य गाठताना लखनौ सुपर जायंट्स केवळ ११९ धावाच करू शकले. अवघ्या १८ षटकांतच त्यांचा संघ सर्वबाद झाला आणि त्यांनी सामना गमावला. लखनौविरुद्धच्या या विजयाचा हिरो म्हणून रवींद्र जडेजा सामनावीर ठरला. कारण त्याने गोलंदाजी करताना निकोलस पूरनची महत्त्वपूर्ण विकेटही घेतली. ऋषभ पंतला बाद केल्याबद्दल दंड ठोठावण्यात आलेल्या नंद्रे बर्गरने या सामन्यात ४ षटकांत २७ धावा देऊन २ बळी घेतले.

### नांद्रे बर्गरवर कारवाई का करण्यात आली?



लखनौ सुपर जायंट्सच्या डावाच्या दुसऱ्या षटकात ऋषभ पंतची विकेट घेतल्यानंतर त्याने सेलिब्रेशन करत पंतला मैदानाबाहेर पाठवण्याचा इशारा केला, जे क्रिकेटच्या नियमांच्या विरुद्ध आहे. यासाठी नांद्रे बर्गर दोषी आढळला आहे.